# महात्मा गांधी : ग्रामस्वराज्य संकल्पना

**प्रा. डॉ. शर्मिला घाटगे,** कला आणि वाणिज्य महाविद्यालय, गडहिंग्लज.

---

**गोषवारा**: भारताचा महासत्ताक राष्ट्र म्हणून जर उल्लेख करायचा असेल तर आंतरराष्ट्रीय पातळीवर झेप घ्यावयाचे असेल तर ती शक्ती गांधी तत्त्वज्ञानामध्ये दिसून येते महात्मा गांधींनी सांगितलेल्या विचारानुसार प्रत्येक खेडेगाव स्वयंपूर्ण स्वावलंबी व स्वयंशासित बनणार नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारताचा सर्वांगीण विकास अशक्य आहे त्यासाठी गांधीजींची गांधीजींचा विचार घेऊन वाटचाल करणे आवश्यक आहे. त्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा शेती व खेडे असून राज्यकर्त्यांनी ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**प्रस्तावना**: राष्ट्रपती महात्मा गांधी म्हणायचे की देशाचा विकास जर करायचा असेल तर ग्रामीण भागाचा विकास होणे आवश्यक आहे. जगात आणि भारतातील मोठमोठ्या शहरात अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.. पण त्या सर्व समस्यांवरील उपाय म्हणजे खेडे होय. आजच्या प्रमाणे त्यावेळी देखील ग्रामीण अर्थव्यवस्था ही अत्यंत महत्त्वाची होती. देशातील बहुसंख्य जनता ही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून होती. सध्याच्या काळात केंद्र सरकारची आदर्श गाव किंवा स्मार्ट व्हिलेज ही जी संकल्पना आहे. ती महात्मा गांधींनी अगोदरच मांडलेली दिसून येते. महात्मा गांधींनी त्याला ग्रामस्वराज आदर्श खेडे स्वयंपूर्ण गावे इत्यादी नावे दिली होती. आदर्श खेड्याची संकल्पना मांडताना ९ जानेवारी १९३७ च्या सभेमध्ये गांधीजी म्हणतात. हिंदुस्थानातील आदर्श खेडे ची रचना अशी असेल की जिथे संपूर्ण स्वच्छता ठेवणे सुकर झाले. महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची कल्पनाही अहिंसेवर आधारित आहे भारतातील खेडी खेड्यातील लोक त्यांना द्यावयाची शिक्षण वळण व योग्य वळण लावणारे लोकसेवक यासंबंधी गांधीजींनी आपले विचार वेगवेगळे व्यक्त केले आहेत महात्मा गांधीजींच्या मते खरा भारत हा शहरात आढळणार नाही .तर तो सात लाख खेड्यात आढळेल भारताची खरी संस्कृती खेड्यामध्येच आहे खेड्यांमध्ये अनेक कलांचा आविष्कार व माणसांचा सुसंस्कृतपणा आहे खेड्याचा विकास झाला तरच भारताचा विकास होईल असे असे गांधीजींची मत होते. प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधी यांची ग्राम स्वराज्य यांची संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**बीजसंज्ञा** : ग्राम ,ग्रामस्वराज्य

**उद्दिष्टे :**

१)ग्रामीण विकासाच्या संकल्पनेचे विचार करणे

२) ग्रामीण विकासात महात्मा गांधींच्या विचारांची विविध पैलू जाणून घेणे

३) ग्रामीण विकासात गांधींची भूमिका स्पष्ट करणे ग्रामीण विकासातील बदल जाणून घेणे

**संशोधन पद्धती** : हा शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधनसामग्रीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामध्येसंदर्भ ग्रंथ क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतलेला आहे.

ग्राम :ग्राम या शब्दाचा अर्थ अभ्यासणे महात्मा गांधीजींनी दिलेला संदेश खेड्याकडे चला जा हेतू अभ्यास या शब्दाचा अर्थ ग्राम या शब्दाचा मूळ अर्थ घरचा समूह असा आहे. प्राचीन वैदिक वाङ्मयात खेड्याचा उल्लेख ग्राम असा करण्यात आला आहे. ग्रामीण हा शब्द ग्राम असून पासून आलेला असला तरी हा शब्दप्रयोग फक्त ग्रामीण ग्रामातील व्यवस्थेशी निगडित नाही. त्याचा अर्थ शहरी व्यवस्थित व्यतिरिक्त भारतीय जीवन व्यवस्था आहे त्या सर्व व्यवस्थेला व्यापणारा आहे .असा अर्थ म्हणजे ग्राम व ग्रामाच्या लगत बाहेर राहणारे पूर्वा स्पृश्य. आदिवासी भारतीय आणि त्यांचे जीवन हेही ग्रामीण याला अभिप्रेत आहे. या सर्व ग्रामांची मिळून भारत हे राष्ट्र बनले आहे. भारताचा आत्मा खेड्यात राहतो असे यथार्थ वर्णन स्वतः महात्मा गांधी यांनी केले आहे .ग्राम या शब्दापेक्षा खेडे हा शब्द दैनंदिन व्यवहारात अधिक प्रमाणात प्रचलित आहे. खेडे ज्यामध्ये प्रधान व्यवसाय शेती असत व ज्यामध्ये प्रमुख व्यक्ती शेतकऱ्यांची असते. त्या गावाला लोक 'खेडे' किंवा 'ग्राम' असे म्हणतात.

देशातील सात लाख खेडी स्वयंपूर्ण झाली तर देशाची प्रगती होईल अशी महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना होती मात्र स्वातंत्र्यानंतर गाव पातळीवर जाती मातीचा विचार बळकट होऊन ही आकर्षण संपन्न उध्वस्त

झाली ग व गावांना विकसित करण्याचे जे सामर्थ्य गांधी विचारत आहे महात्मा गांधींनी या देशाला व जगाला शेकडो संकल्पना दिल्या त्या तक स्वराज्य ही संकल्पना महत्त्वाची आहे दक्षिण आफ्रिकेतून गांधीचे 1915 मध्ये भारतात आले त्यावेळी उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केलेल्या चंपारण सत्याग्रहापासून गांधीजींचे लक्ष ग्रामीण प्रश्नांकडे केले व या सत्याग्रहाचे निमित्ताने गांधीजींनी खरा भारत बघितला खेड्यातील गरिबी निरीक्षता स्वच्छता अभियान यांनी ते व्यक्ती झाले व शेतकरी व कामगारांचे प्रश्न त्यांनी समजून घेतले चंपाळणीचा अनुभव व हिंदू स्वराज्य पुस्तक याची साधे जोड म्हणजेच ग्राम स्वराज्य संकल्पना हो गांधीजी आणि कस्तुरबा गांधी यांनी गावागावात स्वच्छतेचे धडे दिले.गांधीजींचा मुख्य उद्देश हा खेड्यांचा विकास होता. महात्मा गांधींनी भारत फिरून भारतीय परिस्थितीचा अभ्यास केला व शेतकरी कामगार दलित यांचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांनी आपले कार्य सुरू केले खरा भारत हा खेड्यात राहतो आणि जोपर्यंत खेडे विकसित होणार नाही तोपर्यंत देशाच्या सर्व समावेश विकास होणार नाही अशी महात्मा गांधींची खात्री होती म्हणून त्यांनी लिहिले होते की खेड्याचा नाश हा भारताचा नाश आहे आजही हे वाक्य आपल्याला खेड्याकडे बघितले की प्रत्ययास येते.भारतीय खेड्यांचा चा विकास घडवून आणणे ही महात्मा गांधींची संकल्पना होती या खेड्याच्या विकासासाठी त्यांनी चार आर्थिक घटकांवर महत्व दिले एक उत्पादकांनी उत्पादनाचे विकेंद्रीकरण व संपत्तीचे समान वाटप परंतु यासाठी जमीनदारांचे मतपरिवर्तन घडवून आणण्याची आवश्यकता दोन खेडे स्वयंपूर्ण करणे तीन शेतकरी व गिऱ्हाईक या दोन परस्परांनो संबंधित घटकांमधील दलाल नष्ट करणे चार कष्ट करणाऱ्याला उत्पादित वस्तूंचा उपभोग घेता आला पाहिजे महात्मा गांधींनी 1941 स*** रचनात्मक कार्यक्रम हे २५ पाने पुस्तक लिहिले होते या पुस्तकात त्यांनी ग्रामविकासाचा 18 कलमी कार्यक्रम सांगितला होता त्या 18 कलमी कार्यक्रमाच्या माध्यमातून रामराजे अस्तित्वात येईल असे त्यांना म्हटले होते 18 प्रमुख कार्यक्रमाच्या द्वारे खेडी समृद्ध बनवण्याचा महात्मा गांधींचे स्वप्न होते.

गांधीजींच्या ग्राम स्वराज्य संकल्पनेत पुढील घटकांचा समावेश होतो.

१))ग्राम किंवा खेडे
२)श्रमप्रतिष्ठा
३)विकेंद्रीकरण
४)कोटी वृद्ध व लघु उद्योगांना महत्त्व
५)सहकार शेती
६)अस्पृश्यता निवारण
७)शासन व्यवस्था
८)ग्रामीण अर्थव्यवस्था
९ )नवशिक्षण व्यवस्था

**ग्रामस्वराज्य संकल्पना :** ही संकल्पना स्पष्ट करताना महात्मा गांधी प्रामुख्याने खेड्यांच्या स्वयंनिर्भरतेवर भर दिला गांधी असे म्हणतात की प्रत्येक खेडे हे आपल्या गावाच्या गरजा भागण्यासाठी स्वयंपूर्ण असले पाहिजे. तसेच गावचा विकास हा सामुदायिक तत्वावर झाला पाहिजे. महात्मा गांधी यांच्या मते शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती महत्त्वाची असून ती साध्य करण्यासाठी आम्ही विचार केला पाहिजे. कारण त्यांच्यामध्ये खरा भारता शहरात नसून खेड्यात वसलेला आहे ही गोष्ट ते जाणून होते म्हणून शहराच्या विकासातून सर्वांच विकास होणे शक्य नाही. परंतु खेड्यांचा विकास झाला तरच खेडी स्वयंपूर्ण झाली तर सर्वांचा विकास शक्य आहे. ग्रामीण नागरिकांचे जीवनमान उंचावले तर सर्वांना आपले जीवनमान उंचावता येईल या गोष्टींचा सारासार विचार करूनच महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडली. त्याची ही संकल्पना आजच्या शहरी त्याची ही संकल्पना आजच्या शहरी करण्याच्या वाढत्या प्रभावाच्या काळात अतिशय महत्त्वपूर्ण असून शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या आणि सामाजिक आर्थिक समस्यांवर ती उपाय ठरते. खालील बाबींचा गरम स्वराज्य संकल्पनेत  समावेश होतो.ग्राम स्वराज्य संकल्पनेत  गावातील लोकांना निरोगी व स्वच्छ हवा आरोग्यमुक्त घरे  गरजा गावातल्या गावातच भागविण्यासाठी  ग्रामीण उद्योगाची उपलब्धता मोकळ्या घरांची रचना भाजीपाल्याची लागवड व त्या समवेत पश्चिमचे संगोपन करू शकतील. पाण्यासाठी विहिरी असतील गावातील सर्व लोक पाणी काळजीपूर्वक वापरतील स्वयंपूर्ण ग्राम व्यवस्थित प्रार्थना स्थळे, मंदिरे, सहकारी स्वरूपाची गोशाळा असेल. माध्यमिक व प्राथमिक शिक्षणासाठी शाळांची उत्तर व्यवस्थित असेल नैतिक शिक्षण व औद्योगिक शिक्षण दिले जाईल. गावातील प्रश्न गावातच सोडविण्यासाठी पंचायतीची स्थापना करावी. अशी ग्राम स्वराज्याची संकल्पना गांधीजींनी मांडली

१). दोन भारतातील राजकीय व्यवस्थेचा दाखला म्हणून पारंपरिक राजकीय पद्धतीची व्यवस्था गांधीजींना ग्रामसंस्थांच्या माध्यमातून पुनर्जीवन करायची होती. त्यामुळे त्यांनी ग्रामपंचायत ग्रामसभा पाचामुखी परमेश्वर आदी बाबी स्वीकारल्या. याला अनुसरून भारतातील खेडी समृद्ध होण्यासाठी औद्योगीकरणाच्या धर्तीवर वर ग्रामद्योग कुटीरद्योग यांना प्राधान्य देऊन ग्राम्विकासाला चालना देण्याचा हेतू गांधीच्या विचारात होता.

२) महात्मा गांधी यांनी आपल्या हिंदस स्वराज्य या पुस्तकात अशा आदर्श ग्राम उद्योग प्रधान भारताची कल्पना विस्तृत केली होती की त्यामध्ये ग्राम हास स्वावलंबी व आत्मनिर्भर असा राष्ट्राचा एक महत्त्वपूर्ण भाग असेल खेड्यातील परिस्थितीला प्रतिबिंबित करते असेही त्यांनी सुचविले होते.

३) \ग्रामस्वराज्य हे आपल्या देशाचे मोठे आवश्यक आहे खेडी जोपर्यंत स्वावलंबी होत नाहीत. तोपर्यंत राष्ट्राच्या स्वतंत्र्याला अर्थ उरणार नाही असे त्यांचे मत होते.

४) गांधीजींनी गावाच्या आर्थिक समृद्धीसाठी कृषी व ग्रामीण उद्योगांच्या विकासाचे महत्त्व पटवून देताना खादीची कल्पना मांडतात. त्यांनी चरख्यांना जीवनदाता सूर्य असे संबोधले आहे. ग्रामीण उद्योगातील बलुतेदारी ग्रामीण कारागिरी हस्तकला कौशल्य लघु व कुटीरुउद्योगांना प्रोत्साहन देऊन ग्राम पातळीवर शोषण थांबविल्यास गावातील संपत्ती गावातच राहील व गाव समृद्ध होईल हे गांधीजींनी ओळखले होते. महात्मा गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी ग्रामीण ही संकल्पना मांडली होती, ग्रामदान म्हणजे गावातील प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या ताब्यातील शेती ही गावात दान करावी त्यामुळे शेती ही सर्व गावाचीच असेल या शेतीत प्रत्येकानेच काम करावे व झालेल्या उत्पादनातून प्रत्येकास समान हिस्सा देण्यात येईल यामुळे गावाचा विकास झपाट्याने होऊन गाव स्वावलंबीपणे असे त्यांना वाटत होते.

५) महात्मा गांधीजींनी ग्रामीण विकासासाठी ग्रामदान ही संकल्पना मांडली होती, ग्रामदान म्हणजे गावातील प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या ताब्यातील शेतीही गावात दान करावी. त्यामुळे शेती सर्व गावचीच असेल या शेतीत प्रत्येकानेच काम करावे. व झालेल्या उत्पादनातून प्रत्येकासमान हिस्सा देण्यात येईल यामुळे गावचा विकास झपाट्याने होऊन गाव स्वावलंबीपणे असे त्यांना वाटत होते.

६) प्रत्येक खेडेगावाने एक दुसऱ्या सहकार्य करावे एकमेकांच्या वस्तू खरेदी कराव्यात त्यांच्या आनंदात व दुःखातही सहभागी व्हावे या प्रवृत्तीमुळे खेडी दोष द्वेषमुक्त स्पर्धा मुक्त म्हणून स्वावलंबी होण्यास व खेडेगावाचा काय अपलोड होण्यास मदत होईल.

७) एकंदरीत गांधीजींनी ग्राम स्वराज्य संकल्पनेत एका शोषण विहिरीत आर्थिक आणि सामाजिक समानतेवर आधारलेल्या समाजाचे चित्र साकारण्यासाठी त्यांनी विश्वस्त सिद्धांत मांडला. या त्यांनी राजकीय व सामाजिक विकासाबरोबर आर्थिक विकासासाठी उत्पन्नाचे सम न्यायवाटप व यासाठी आर्थिक विकेंद्रीकरणाची आवश्यकता सांगितली.

८) गांधीजींनी असे ही सुचवले की वर्ग संघर्ष टाळून श्रीमंताकडून गरिबाकडे संपत्तीचे हस्तांतरण व्हावे धनिकांनी संपत्तीचे मालक न बनता केवळ विश्वस्ताची भूमिका बजवावी अतिरिक्त धनाचा वापर हा ग्रामीण गरिबाच्या कल्याणार्थ वापरावा. महात्मा गांधींनी ग्राम स्वराज्य संकल्पनेविषयी जे विचार मांडले ते आजच्या काळात आणि त्या काळात निश्चितच उपयोगी पडणारे आहेत.

महात्मा गांधींनी भारत फिरून भारतीय परिस्थितीचा अभ्यास केला व शेतकरी कामगार दलित यांचे प्रश्न लक्षात घेऊन त्यांनी आपले कार्य सुरू केले खरा भारत हा खेड्यात राहतो आणि जोपर्यंत खेडे विकसित होणार नाही तोपर्यंत देशाच्या सर्व समावेश विकास होणार नाही अशी महात्मा गांधींची खात्री होती म्हणून त्यांनी लिहिले होते की खेड्याचा नाश हा भारताचा नाश आहे आजही हे वाक्य आपल्याला खेड्याकडे बघितले की प्रत्ययास येते.

निष्कर्ष:

१)महात्मा गांधींच्या विचारसरणीत ग्रामीण विकासाला महत्त्वाचे स्थान होते

२) महात्मा गांधींनी खेडे या विकासाचा केंद्रबिंदू मांडला गांधीजी म्हणतात खेडे हे भारताचे हृदय आहे म्हणून खेड्याकडे चला असा संदेश त्यांनी दिला

३) गावे स्वयंपूर्ण बनवून जनतेच्या संपूर्ण गरजा गावातच भागल्या जाव्यात अशी गांधीजींची धारणा होती.

४) महात्मा गांधीजींनी स्वावलंबी आदर्श गावनिर्मित ग्राम स्वच्छता व ग्राम आरोग्य यांना महत्त्वाचे स्थान दिले

५)महात्मा गांधीजींचा ग्रामस्वराज्य संकल्पनेचा दृष्टिकोन आजही प्रासंगिक आणि व्यवहार्य हे ठरतो.

६)१९४७ पूर्वी भारतात दारिद्र्य बेकारी संपत्तीचे विस्तार उपासमारी या समस्यांच्या विचार केला, तर गांधीजींचे ग्रामस्वराज्य, कुटीर उद्योग लघु उद्योग इत्यादी विषयीचा विचार हा भांडवलशाही शोषण व विषमता आणि साम्यवादातील दमण हिंसा पक्षीय दडपशाही यांना टाकून मिश्र अर्थव्यवस्था प्रेरित सामाजिक न्यायावर आधारित समाजवादी समाज रचनेची पायाभरणी करतो.

समारोप: महात्मा गांधी महात्मा गांधींनी ग्राहक स्वराज्य संकल्पनेच्या माध्यमातून खेड्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केला खेड्याकडे चला ही जातींची घोषणा या संकल्पनेच्या माध्यमातून साथ देते खेड्यातील राजकीय सामाजिक आरोग्य सामाजिक आर्थिक शैक्षणिक विकास झाला पाहिजे तसेच खेड्यातील लोकांची आरोग्य निरोगी व स्वच्छ राहिले पाहिजे यासाठी स्वच्छतेवर भर दिला ग्रामीण जीवनाच्या अनेक पैलूंवर त्यांनी दृष्टीक्षेप टाकला खेड्याचा विकास करण्यासाठी महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडली एकूणच ग्रामीण लोकांच्या उत्कर्षासाठी आजच्या काळात सुद्धा ग्रामस्वराज्याची संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१) अर्थशास्त्र भाग एक: डॉ. किरण देसल दीपस्तंभ प्रकाशन
२) भारदे बाळासाहेब ग्राम क्रांतीची दिशा महात्मा गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे २००३
३) भारदे बाळासाहेब गांधी विचार दर्शन ग्रामस्वराज्य पृथ्वीराज प्रकाशन पुणे.१९९५
४) खान इकबाल पंचायत राज्य व ग्रामीण विकास योजना रितू पब्लिकेशन्स जयपुर २००४
५) विकासपीडिया३० सप्टेंबर २०१५ ग्रामस्वराज्य
६ महात्मा गांधी ग्रामस्वराज्य अहमदाबाद नवजीवन पब्लिशिंग हाऊस
७ ग्रामस्वराज्य महाराष्ट्र गांधी स्मारक निधी गांधीभवन पुणे 1995
८ गांधी म ग्रामस्वराच्या अलाहाबाद प्रकाशन
९ कराळे गंगाधर ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन नागपूर मंगेश प्रकाशन २००८
१० धर्माधिकारी भाऊ गांधी विचार दर्शन राजकारण खंड एक मधील गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे तृतीय आवृत्ती 1995